नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-
कार्यक्रम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी
मार्गदर्शक तत्वे विहित करणे, विविध सवलतींचे
एकत्रित आदेश निर्गमित करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकःटिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ फेब्रुवारी,२००३.

वाचा :- (१) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्रमांकःआस्था-१०९७/ प्र.क्र.१८/का.१५, दि.५ फेब्रुवारी,१९९९.
(२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ/ २०००/ प्र.क्र.३/बारा, दि.६ ऑगस्ट, २००२ .
(३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-टीआरएफ/ २०००/ प्र.क्र.३/बारा, दि.५ सप्टेंबर, २००२ .

शासन निर्णय

संदर्भाधीन क्रमांक-२ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व आदिवासी / नक्षलग्रस्त भागात अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी काही मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली असून विविध सवलतींचे एकत्रीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ मधील मुद्दा (क) मध्ये संदर्भाधित ३ येथील दि.५ सप्टेंबर,२००२ च्या शासन निर्णयानुसार सुधारणा करण्यात आली होती. सदर दिनांक ५ सप्टेंबर,२००२ चे आदेश रद्द करुन संदर्भाधिन २ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयातील परि.२ (क) समोरील सुधारीत सवलतींच्या स्तंभ क्र.२ मधील तरतुद खालीलप्रमाणे सुधारीत स्वरुपात वाचण्यात यावी :-

" शा.नि.आदिवासी विकास विभाग,क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५,दि. ५ फेब्रुवारी,१९९९ अन्वये प्रोत्साहन भत्त्यासाठी विहित केलेल्या अटींमध्ये फक्त अट क्रमांक-२ आणि ६ वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित क्र.१ तसेच क्र.२ ते ५ येथील अटींमध्ये कोणताही बदल नाही." च्या ऐवजी "शा.नि.आदिवासी विकास विभाग,क्र.आस्था-१०९७/ प्र.क्र.१८/का.१५, दि.५ फेब्रुवारी,१९९९ मधील प्रचलित सवलतीतील स्तंभ-१ ((क) प्रोत्साहन भत्त्याच्या अटी) मधे जर ६ अटी नमूद करण्यात आल्या आहेत त्यापैकी अट क्र.२ आणि ६ वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित क्र.१ तसेच क्र.३ ते ५ या अटींमध्ये कोणताही बदल नाही."

सर्व विभाग/कार्यालये यांनी संदर्भाधीन क्रमांक-२ येथील दि.६ ऑगस्ट,२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ (क) चे संदर्भात वरील सुधारणानुसार कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

(कृ.मा.प...